Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण आणि भारतीय अर्थव्यवस्था विशेष संदर्भ - बौद्धिक संपदा मूल्याचे महत्त्व

**प्रा. डॉ. संदीप तुंडूरवार**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय (स्वायत्त), नागपूर

**कोमल मोरेश्वर ढगे**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर
Email Id - komaldhage25@gmail.com

---

**सारांश :**

*राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार आणि भारतीय अर्थव्यवस्था विशेष संदर्भ बौद्धिक संपदा मूल्याचे महत्त्व प्रस्तुत शोधनिबंधात प्रथम बौद्धिक संपदा म्हणजे काय? बौद्धिक संपदा अधिकार,बौद्धिक संपदा अधिकारांचे वैश्विक स्तरावरील स्वरूप,राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण आणि याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारा वर्तमान आणि भविष्यकालीन परिणाम या सर्व मुद्द्यांना समजून,बौद्धिक संपदा अधिकार परिप्रेक्षात बौद्धिक संपदा मूल्याचे महत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

**बीज शब्द** : बौद्धिक संपदा, राष्ट्रीय धोरण, अर्थव्यवस्था, अधिकार, ज्ञान, व्यवसाय

---

. "A Spark of Knowledge Has Ignited" असे आज ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात मग ते सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व अन्य कोणतेही क्षेत्र जे मानवी अस्तित्वाशी जुडलेले क्षेत्र असो सहज म्हटल्या जाते. मानव त्याच्या जीवनातील अनुभव आणि जिज्ञासू वृत्तीतून प्राप्त माहितीचे चिंतन करतो, त्या माहितीचा आपल्या किंवा इतरांच्या विकासाकरता उपयोग करतो, यात प्रसंगी अचानक एखादी जटील समस्या त्याला खुणावते त्यावर उपाय योजतो तसेच नवीन विचारांची नवनिर्मिती करतो, या सर्व क्रियांमध्ये व्यक्तीची बौद्धिक क्षमता आणि बौद्धिक क्षमतेच्या माध्यमातून केलेले परिश्रम महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. मानवाच्या या बौद्धिक परिश्रमांना मूल्य प्राप्त होऊन बौद्धिक संपदा ही अर्थपूर्ण संकल्पना तयार होते. बौद्धिक संपदा म्हणजे, " मनुष्याची बौद्धिक गुणवत्ता आणि परिश्रम तसेच व्यक्तीच्या सर्जनक्षमतेमुळे त्या व्यक्तीस जी संपत्ती प्राप्त होते ती बौद्धिक संपदा होय."1 तसेच " संपत्ती ही विविध प्रकारची असते. उदाहरणार्थ सोने, चांदी, जमीन, शेती,पैसा, गाडी इत्यादी ही डोळ्यांनी दिसणारी जिचा उपभोग घेता येतो, अशी संपत्ती आहे.त्याचप्रमाणे एक न दिसणारी स्पर्श न करता येणारी अशीही एक संपत्ती असते.ही संपत्ती मानवाची बुद्धी कल्पकता नवसंशोधन प्रतिभा यांच्या संयोगातून तयार होत असते. त्याला म्हणतात बौद्धिक संपत्ती किंवा बौद्धिक संपदा."2 यावरून बौद्धिक संपदेचा अर्थ स्पष्ट होतो.

बौद्धिक संपदेतून प्राप्त ज्ञानाचा लाभ व्यक्ती,समाज, राष्ट्र आणि वैश्विक स्तरावरील इतरांना करून देत असताना ज्ञानाच्या मूळ निर्मात्याला त्याचे योग्य ते श्रेय व मोबदला मिळायला हवा या भावनेतून बौद्धिक संपदा अधिकारांची चर्चा प्रथम इटली तसेच वेनिस मधील 15 व्या शतकातील बौद्धिक संरक्षण कायद्याच्या माध्यमातून

सुरू झाली आणि आज बदलत्या जागतिकीकरण संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात हक्क, अधिकार आणि न्यायाच्या मागणीतून आर्थिक विकासाच्या स्वरूपात संपूर्ण जगात महत्त्वपूर्ण ठरत आहे. बौद्धिक संपदा अधिकाराला अर्थव्यवस्था,कलात्मक्ता व साहित्यिक दृष्ट्या महत्त्व पॅरिस संमेलन (1883 ) तसेच बर्न कन्वेंशन (1886) या दोन संम्मेलनातून प्राप्त झाले. पॅरिस संमेलन (1883) ज्यात औद्योगिक संपत्ती संरक्षणाकरता,"पॅरिस कन्वेंशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ इंडस्ट्रियल प्रॉपर्टी" कायदा महत्त्वपूर्ण ठरला तसेच बर्न कन्वेंशन (1886) ज्यात साहित्यिक आणि कलात्मक कार्यांच्या संरक्षणाकरता "बर्न कन्वेंशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ आर्टिस्टिक वर्क्स" महत्त्वपूर्ण ठरला. जागतिक स्तरावरील या कन्व्हेन्शन्स मुळे बौद्धिक संपदा अधिकाराबाबत जाणीव जागृतीला प्रारंभ झाला. यानंतर संयुक्त राष्ट्र संघ मानव अधिकारांच्या सार्वभौमिक घोषणापत्रातील कलम 27.2 नुसार, "Everyone has the right to the protection of the moral and material interest resulting from any scientific, literary or artistic production of which he is the author." अशी तरतूद करून बौद्धिक संपदा मूल्यांच्या सुरक्षेसंदर्भात दखल घेण्यात आली. याचा परिणाम संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य देशांमध्ये बौद्धिक संपदा अधिकार विषयक जाणीव जागृती प्रति सकारात्मक प्रतिक्रिया जागतिक पटलावर उमटू लागल्या. जागतिक बौद्धिक संपदा संघटना 1967 ला स्थापन करून बौद्धिक संपदा अधिकाऱ्यांना संरक्षण आणि व्यवस्थापनात सहकार्य करण्यात येते. या संघटनेत 193 देश सदस्य आहेत. सदस्य देशांनी पेटंट्स, ट्रेडमार्क, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा अधिकार विषयक कायदे तरतुदी अधिक प्रभावीपणे विकसित कराव्यात याबाबत यात तरतूद आहे, तसेच याबाबत संचालन आणि प्रोत्साहन देण्याकरता पुरस्कार यांचे नियोजन करते. वैश्विक बौद्धिक संपदा संघटना 'कॉपीराईट करार' WTC (1996) ज्यात डिजिटल काळातील कॉपीराईट संरक्षण, वैश्विक बौद्धिक संपदा संघटना परफॉर्मन्सेस आणि फोनोग्राम्स करार (WPPT-1996) या माध्यमातून बदलत्या तंत्रज्ञानानुसार कायद्यांमध्ये नवीन तरतुदी आणि नाविन्यता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सन 1970 पासून वैश्विक बौद्धिक संघटनेच्या तरतुदींची अंमलबजावणी सुरू झाली आणि जागतिक अर्थव्यवस्था अधिक कौशल्य युक्त नवनिर्मितीक्षम कशी करता येईल याचा प्रयत्न सुरू झाला, यातून बौद्धिक संपदा मूल्याचे जागतिक स्तरावरील महत्त्व आणि जाणीव जागृती अधोरेखित होते.

भारत संयुक्त राष्ट्र संघटनेचा सक्रिय सदस्य देश आहे.संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध योजना तरतुदी यांच्या प्रति भारताने आपले सहकार्यात्म धोरण ठेवले आहे. यापैकी बौद्धिक संपदा अधिकारांबाबत भारत संयुक्त राष्ट्र संघाला सहकार्यात्मक आहे. भारतात देखील बौद्धिक संपदा मूल्याला मूलभूत अधिकारांप्रमाणेच महत्त्वपूर्ण समजून बौद्धिक संपदा अधिकाऱ्यांच्या संरक्षणार्थ पुढील कायदे महत्त्वपूर्ण वेळोवेळी करण्यात आले यात, 1.कॉपीराईट कायदा -1957 यानुसार साहित्य, चित्रपट, ध्वनिमुद्रण,कलात्मक, कौशल्य, नाट्य, संगीत याबाबत व्यक्ती किंवा संस्थांच्या बौद्धिक संपदा संरक्षणार्थ तरतुदी करण्यात आल्यात.2. ट्रेडमार्क कायदा - 1990 यानुसार वस्तू आणि सेवांच्या ब्रँड, लोगो आणि इतर चिन्हांच्या संरक्षणार्थ कायदा करून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानकांशी सुसंगतता राखण्याचा प्रयत्न करण्यात आला. 3. पेटंट कायदा – 1970 हा कायदा शोध,उत्पादन, औषध तसेच अन्न इत्यादी क्षेत्रातील प्रक्रियांच्या संरक्षणार्थ तयार करण्यात आला. 4. डिझाईन कायदा - 2000 नुसार उत्पादनाच्या बाह्य स्वरूपातील बाबींविषयीच्या संरक्षणार्थ तरतुदींचा यात समावेश करण्यात आला. 5. भौगोलिक संकेत कायदा – 1999 त्यानुसार भौगोलिक क्षेत्रांशी संबंधित उत्पादनांच्या वैशिष्ट्ये करण्याच्या

संरक्षणार्थ तरतुदींचा यात समावेश करण्यात आला आहे. 6. सूक्ष्मजीव आणि वनस्पती संरक्षण कायदा - 2001 नुसार नवीन जातींचे संरक्षण तसेच शेतकऱ्यांच्या पारंपारिक हक्कांचे संरक्षण करणारा भारत प्रथम देश ठरला. याची जगाने दखल घेतली आणि भारताचे वैश्विक पटलावर बौद्धिक संपदा मूल्यांची जपणूक करणारा देश म्हणून ओळख निर्माण झाली. भारतीय अर्थव्यवस्थेला बौद्धिक संपदा मूल्याच्या माध्यमातून विकासाच्या दिशेने नेण्याकरता "Creative India ;Innovative India" या उद्देशावर आधारित "राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण – 2016"(National IPR Policy -2016) भारत सरकार तर्फे जाहीर करून बौद्धिक संपदा अधिकारांप्रती जागरूकता आणि या अधिकारांची मागणी करणाऱ्या अर्थव्यवस्थांसोबत सहयोग आणि समायोजनाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी,उद्योग,सेवा यांच्या मदतीने जगातील सर्वात गतीने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. या वाढत्या अर्थव्यवस्थेत येथील व्यक्ती, संस्था यांच्या बौद्धिक संपदेचा मोठा वाटा आहे, आणि यामुळेच व्यक्ती,संस्था यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण व्यवस्थापन आणि योग्य ते श्रेय मिळावे याकरता बौद्धिक संपदा अधिकार विषयक कायद्याची महत्त्वाची भूमिका आहे. भारतातील बौद्धिक संपदेचे व्यवसायिकीकरण करून आर्थिक विकासात या संपदेचा उपयोग करण्याकरता तसेच बौद्धिक संपदा अधिकारांप्रती जागरूकता निर्माण करण्याकरता या संदर्भातील कायद्यांना प्रशासकीय दृष्ट्या, जलद आणि पारदर्शक करून नवसंशोधक आणि उद्योग तसेच नव उद्योगांना प्रोत्साहन देणे याकरता राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण महत्वपूर्ण आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेला संपूर्ण जगात कौशल्य आधारित करण्यात महत्त्वपूर्ण ठरत आहे. भारत सरकारच्या भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी, भारतातील अभिजात ऊर्जा आणि नवनिर्मिती करता राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरणाच्या माध्यमातून परकीय गुंतवणूक तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात निर्माण झालेल्या स्पर्धेत टिकून राहण्याकरता प्रयत्न करण्यात येत आहेत.

भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' (25 सप्टेंबर 2014) ज्यात ऑटोमोबाईल, खान, रक्षण, रेल्वे, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मासिटिकल्स आणि विविध प्रक्रिया उद्योगांना केंद्रबिंदू ठरवून उद्योग, रोजगार आणि यातील नवनिर्मित डिझाईन क्षेत्रात बौद्धिक संपदेचा उपयोग करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचा उपयोग या योजनेच्या यशस्वीते करता महत्त्वपूर्ण आहे. यानंतर 'स्टार्ट अप इंडिया' (16 जानेवारी 2016) या भारत सरकारच्या उद्योजकतेला आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या योजनेमुळे भारत जगातील तिसऱ्या सर्वाधिक स्टार्टअप असलेला देश बनला आहे. या योजनेच्या माध्यमातून नवीन उद्योजकांच्या बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय बौद्धिक संपदा धोरण उपयुक्त आहे. भारत सरकारच्या 'डिजिटल इंडिया' (1 जुलै 2015) या भारतात डिजिटल क्रांती घडवून आणण्याकरता निर्माण योजनेमुळे भारतातील डिजिटल क्षेत्रातील बौद्धिक संपदेला राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण बळ देणारे आहे. यातून भारत सरकारच्या भारतीय अर्थव्यवस्था आणि संस्कृतीच्या विकासात महत्त्वपूर्ण 'रचनात्मक भारत अभिनव भारत' या संकल्पनेला पूर्णत्वास आणण्याकरता प्रयत्न केल्या जात आहे. यातून भारतीय अर्थव्यवस्थेत बौद्धिक संपदा मूल्य महत्त्वपूर्ण असल्याचे समजून येते .

राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरणाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या प्रत्येक

घटकाच्या बौद्धिक संपदेच्या सुरक्षेची एक प्रकारे हमीच हे धोरण देण्याचा प्रयत्न करते. या धोरणाद्वारे केवळ विशिष्ट व्यक्ती, संस्था,उद्योजक किंवा उद्योग यांच्याच बौद्धिक संपदा अधिकारांचे संरक्षण केल्या जाणार नाही तर यातून कमी सशक्त समूह ज्यात शेतकरी, कारागीर,विणकर यांना त्यांच्या बौद्धिक संपदेच्यानुसार आर्थिक मदत ही ग्रामीण बँका किंवा सहकारी बँकांच्या आधारे कर्ज स्वरूपात,कर्ज प्रक्रिया सुलभ करून देण्याच्या माध्यमातून करण्याची तरतूद करण्यात आली आहे. यात ट्रेडमार्क यांच्या आवेदन पत्रांच्या पडताळणी करता तसेच नोंदणी करता लागणाऱ्या कालावधीला आठ महिन्यांचा जो कालावधी लागायचा त्याला एक महिन्याचा प्रयत्न केला जाणार आहे तसेच पेटंट अधिकारांच्या बाबतीत सरलीकरण प्रक्रियेचा समावेश आहे विशेष म्हणजे या धोरणानुसार बौद्धिक संपदा अधिकारांची पायमल्ली किंवा गैरवापर थांबविण्याकरता कायदेशीर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.भारतातील कॉपीराईट धोरणात बदल करून यात संगीत, चित्रपट आणि औद्योगिक रेखाचित्र यांचा समावेश या योजनानुसार करण्यात आला आहे. या धोरणानुसार सरकार,युवक,खाजगी प्रयोगशाळा आणि सार्वजनिक उपक्रमांना व्यावसायिक दृष्ट्या नफा प्राप्त होण्याकरता बौद्धिक संपदेच्या नवनिर्मिती करता प्रोत्साहन देऊन आर्थिक विकासात त्यांनी आपला वाटा देऊन विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत आहे. राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण जसे भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देणारे आहे. या धोरणामुळे भारतातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासाकरता व्यक्ती, संस्था यांच्या बौद्धिक संपदा उपयुक्त ठरणार आहे आणि म्हणूनच म्हटले जाते, “ इस नीती से ऐसी बौद्धिक संपदा संस्कृती पोषित होने की उम्मीद है जो सभी रचनाकारो तथा अभिनवकारो को आयपीआर का सृजन करणे, संरक्षण करणे तथा उसका इस्तेमाल करने के लिए अपनी क्षमतावो का एहसास कराने में उनका मार्गदर्शन करेगी और उन्हे कार्यक्षम बनायेगी जिससे संपत्ती सृजन रोजगार अवसरो तथा व्यवसाय विकास मे योगदान मिलेगा.”3

राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण लागू झाल्यापासून 2018 ते 2023 दरम्यान पेटंट आणि औद्योगिक डिझाईन संख्या दुप्पट झाली आहे तर ट्रेडमार्क नोंदणी मध्ये 60% वाढ झाली आहे. यामुळे भारताच्या बौद्धिक संपदा आणि नवोपक्रमावरील वाढत्या घराची स्पष्ट झलक दिसून येते. भारताच्या पेटं टू जीडीपी गुणोत्तरात देखील महत्त्वपूर्ण वाढ झाली आहे. जी मागील दशकात 144 वरून 381 वर पोहोचली आहे यावरून देशातील बौद्धिक संपदा क्रियाशीलता आर्थिक विस्तारासोबत वेगाने वाढत असल्याचे सूचित होते असे भारत सरकारच्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरणाद्वारे प्रसारित माहितीवरून स्पष्ट होते.

वरील विश्लेषणाच्या आधारे भारतीयच नव्हे तर जागतिक स्तरावरील बौद्धिक संपदा मूल्याप्रती असलेली समज आणि जागरूकता भविष्यात अर्थव्यवस्था विकासाकरता महत्वपूर्ण असल्याचे समजून घेता येते.

**समारोप :**

अशाप्रकारे राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरण आणि भारतीय अर्थव्यवस्था याबाबत विश्लेषणात्मक अध्ययन प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. यातून बौद्धिक संपदा मूल्याचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित होते. धोरण म्हटलं की अंमलबजावणी करताना काही अडथळे येतीलच राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार धोरणात देखील काही अडथळे आहेत यात नवउद्योगांना प्रोत्साहन देताना आर्थिक

मदतीच्या नावावर होणारे आर्थिक घोटाळे, याबाबतच्या कायदेशीर प्रक्रियांची गुंतागुंत, आंतरराष्ट्रीय दबाव आणि स्थानिक गरजा, न्यायालयीन विलंब, माहिती गोपनीयतेचा प्रश्न, बौद्धिक संपदा अधिकारांप्रती असलेली समाजातील उदासीनता इत्यादी प्रश्नांना भारत सरकारने प्रशासकीय यंत्रणांच्या मदतीने सोडविण्याकरता पारदर्शकता सातत्याने ठेवण्याचा प्रयत्न करावा. एकंदरीत कालखंड कुठलाही असो मग तो प्राचीन मध्ययुगीन किंवा आजचा कृत्रिम बुद्धिमत्तेला महत्त्व असलेला या सर्व कालखंडामध्ये मानवी विकासात मानवी बौद्धिक संपदा मूल्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे व भविष्यात देखील मानवी अस्तित्वाला उपयुक्त आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**संदर्भग्रंथ सूची :**


- मराठी विश्वकोश, शैलजा देसाई,30/12/2022,https://marathivishvkosh.org.
- प्रा. डॉ. डी बी कोनाळे,सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.
- https://knowledgeresononce.com.
- डॉ.विकास दिव्य कीर्ती, निशांत जैन (आयएएस ),निबंध दृष्टी, दृष्टी पब्लिकेशन्स दिल्ली, डिसेंबर 2023.
- https://www.wipo.int
- https://www.un.org
- https://www.india.gov.in


.